# कार्यकारी सारांश

# महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेड

# यांचा त्यांच्या

# वितरण व्यवसायासाठीचा

# विनंती अर्ज

## १. कार्यकारी सारांश :

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (मविनिआ) (बहुवर्षीय वीज दर ) नियम २०११ व २०१५ अंतर्गत तरतुदीनुसार अर्जदार हा अर्ज मा.आयोगासमोर खालील मान्यतेसाठी दाखल करीतआहे :

(अ) आर्थिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ चा अंतरीम खरेपणा तसेच तफावत (Gap) / उरणारी शिल्लक (Surplus) मविनि आयोगाच्या (बहुवर्षीय वीज दर) नियम, २०११ नुसार ठरविणे.

(ब) आर्थिक वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ चा अंतिम खरेपणा व तफावत /उरणारी शिल्लक मविनि आयोगाच्या (बहुवर्षीय वीज दर) २०१५ नियमानुसार ठरविणे.

(क) आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० साठीच्या विविध एकत्रित आर्थिक महसुलाची आवश्यकता व तफावत /उरणारी शिल्लक मविनि आयोगाच्या (बहुवर्षीय वीज दर) नियम २०१५ नुसार ठरविणे.

(ड) आर्थिक वर्ष २०१९-२० साठी मविनि आयोग (बहुवर्षीय वीज दर) नियम, २०१५ नुसार वीज दर ठरविणे.

१.१ कंपनी प्रोफाइल व तत्सम इतिहास :-

१.१.१ महाराष्ट्र शासनाने सन २००२ मध्ये अर्जदार कंपनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लिमिटेड (मविविकं) ची स्थापना एक विशेष हेतु कंपनी म्हणून Multi Modal International Hub Airport at Nagpur (MIHAN) मिहान प्रकल्पाचे विकासक म्हणून महाराष्ट्र राज्यात क्षेत्रीय हवाई जोडणीसाठी करण्यात आली. मिहान प्रकल्प अंमलात आणण्यासाठी व इतर विमानतळ कार्यरत करण्यासाठी अर्जदार विशेष कार्यरत आहे. मविविकंपनी मर्या. कंपनी कायदा १९५६ अंतर्गत स्थापना झालेली आहे. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ८ वा मजला , जागतिक व्यापार केंद्र १, कफ परेड, मुंबई -४०० ००५ येथे आहे.

१.१.२ दिनांक ०२/०१/२००७ रोजी मिहान भागात कार्यक्षम व सलग वीज मिळण्याच्या उद्देशाने एकत्रित उद्देश कंपनी (Joint Venture Company) स्थापनेच्या हेतुने कोळशावर आधारित वीज प्रकल्प उभारण्यासाठी दिनांक २४/०४/२००७ च्या जाहिरातीद्वारे अर्जदाराने प्रस्ताव मागविले. मविविकंपनीने या प्रकल्पाच्या कार्यवाहीसाठी अभिजित ग्रुपची निवड बांधा, वापरा, हस्तांतरीत करा या तत्वावर केली.

१.१.३ अेएमएनइपीएल ची स्थापना एकत्रित उद्योग (Joint Venture) म्हणुन अभिजित ग्रुप बरोबर करण्यात आली आणि आज मविविकंपनी जवळ एएमएनइपीएल कंपनीचे २६% वितरीत भाग भांडवल आहे. दिनांक २२/०६/२००७ रोजी मेमोरंडम ऑफ असोसिएशन, आर्टीकल्स ऑफ असोसिएशन ऑफ एएमएनइपीएल सांक्षाकित केले. स्पर्धात्मक निविदांच्या आधारे दिनांक ०७/११/२००७ रोजी मविविकंपनी व एएमएनइपीएल यामध्ये सवलत करार (Concession Agreement) साक्षांकित करण्यात आला.

१.१.४ दिनांक ०२/०४/२००९ रोजी अर्जदार, एएमएनइपीएल, अभिजित इन्फ्रास्ट्रकचर लिमीटेड व अभिजित इन्फ्रा लिमिटेड अेएमएनइपीएल चे भागधारक म्हणून परस्पर संबंध राखण्यासाठी व

एएमएनइपीएल च्या कार्याबद्दल विशेष बाबींचे कार्यान्वयन राखण्यासाठी शेअर होल्डर्स करार (shareholder Agreement) सांक्षाकित करण्यात आला.

१.१.५ त्यानंतर एएमएनइपीएलने प्रकल्पाची कामे सुरु केली. त्याचबरोबर अर्जदाराने पारेषण व वितरण व्यवस्थेचे काम सुरु केले. प्रकल्पाचे पहिले जनित्र ०६ जानेवारी २०११ रोजी कार्यान्वित झाल्याचे जाहीर करण्यात आले. त्यानंतर एएमएनइपीएलने इतर जनित्रे कार्यान्वित झाल्याचे जाहीर केले व चौथे जनित्र दिनांक ०१/०८/२०११ रोजी कार्यान्वित झाल्याचे जाहीर केले.

१.१.६ आयोगाने अर्जदाराचा अर्ज क्र.Case no.16 of 2011 च्या दिनांक ३ ऑगस्ट २०१२ च्या आदेशाने अर्जदाराला जाहीर विशेष आर्थिक क्षेत्रासाठी डिम्मड वितरण परवानाधारक म्हणुन जाहीर केले.

१.१.७ अर्जदाराने अर्ज दिनांक १३/०७/२०१२ नुसार वीजदर ठरविण्यासाठी व ७/११/२००७ रोजी सांक्षाकित केलेल्या अर्जदार व एएमएनइपीएल यांच्यामधील सवलत करारातील दुरुस्ती करण्यासाठी दोन्ही बाजुंच्या सहमतीने सवलत करार वीज कायदा २००३ शी सहमत करण्यासाठी टाकलेले कलम मान्य करण्यासाठी अर्ज दाखल केला याविषयी पहिली सुनावणी दिनांक १७/०८/२०१२ रोजी झाली. अर्जदाराने अर्ज वीज कायदा २००३ कलम ६३ अंतर्गत मान्य करण्यासारखा नसल्याचे मान्य केले व सुधारित अर्ज दाखल करण्यास आयोगाची परवानगी मागितली. अर्जदाराने सुधारित अर्जात चुकीच्या कलमाखाली पूर्वीचा अर्ज मूळ अर्ज दाखल केल्याचे मान्य केले व नमूद केले की मिहान सेझमधील ग्राहकांच्या वीज दर वितरणासाठी ठरविणे व किरकोळ विजविक्रीसाठी दर ठरविणे कायद्याच्या कलम 62(1) (d) खाली येते. दिनांक २२/१०/२०१२ च्या दुस-या सुनावणीच्या वेळी अर्जदाराने अर्ज काढून घेण्याची विनंती केली. मा.आयोगाने केस क्र.६५ ऑफ २०१२ च्या दिनांक ०५/१२/२०१२ च्या आदेशाप्रमाणे अर्जदाराला अर्ज काढून घेण्याची परवानगी दिली.

१.१.८ दिनांक १५/०२/२०१३ रोजी एएमएनइपीएलने भांडवली खर्चाला परवानगी व ६१.५ मेगावाटच्या एका जनित्रातून तयार होणाऱ्या विजेच्या निश्चित वीज दर निश्चिती करता अर्ज दाखल केला. अर्जदार कंपनीने दिनांक ०८/०२/२०१३ रोजी मध्यस्थ अर्ज (Intervention) हा अर्ज ०७/११/२००७ च्या सवलत करारानुसार दाखल करत असल्याचे सांगत दाखल केला.परंतु अर्जदाराने वीज खरेदी कराराच्या मान्यतेसाठी व अेएमएनइपीएलकडून वीज घेण्याबाबत मा.आयोगाकडे मान्यतेसाठी विनंती केली नाही. तसेच संपूर्ण स्पर्धात्मक निविदा व तद्नंतरचा सवलत करार साक्षांकित करणे या दरम्यान मा.आयोगाची पूर्व परवानगी घेतली नाही. मा. आयोगाने सवलत करार हा निजी वीज कंपनी व ग्राहक यामधील करार असल्याची मान्यता दिली. हा करार वितरण कंपनीला वीज देण्याबद्दल कधीही नव्हता. यास्तव सवलत करार हा एएमएनइपीएल वीज निर्मिती कंपनी व मविविकंपनी वितरण कंपनी यामधील वीज खरेदी करार असल्याचे मानता येत नाही. मा.आयोगाने २३ of २०१३ च्या केसमधील दिनांक

२३/०८/२०१३ च्या निर्णयानुसार एएमएनइपीएलचा वीज खरेदी दर ठरविण्याचा अर्ज रद्दबादल ठरविला.

१.१.९ या दरम्यान अर्जदार व एएमएनइपीएल यांचे दरम्यान वाद उद्भवला व दोघानीही कर्तव्यच्युती (Default) च्या नोटीस दोघानीही मविविकंपनी व एएमएनईपीएल यांनी एकमेकाविरुध्द नोंदविल्या दिनांक २४/१०/२०१३ रोजी एएमएनईपीएलने लहरी पणाने व "एकतर्फी करार" संपुष्टात आणण्याच्या उद्देशाची सूचना "Notice of Intent to terminate" अर्जदाराला दिली.

१.१.१० त्यानंतर दिनांक ०५/११/२०१३ रोजी एएमएनईपीएल ने एकतर्फी प्रकल्प बंद केला. डीझेल जनरेटर वापरुन वीज पुरवण्यात येत होती. दिनांक २६/११/२०१३ रोजी अर्जदाराने "कर्तव्यच्युती सूचना" व "करार संपुष्टात आणण्याच्या उद्देशाची सुचना" यांचे उत्तर पाठविले व एएमएनईपीएलला विनंती केली की, वरील सुचना मागे घ्याव्या कारण त्या चुकीच्या माहितीवर आधारित व करारातील रचनेच्या पूर्णत: विसंगत आहेत. दिनांक २४/०१/२०१४ रोजी एएमएनईपीएलने सूचना दूर करण्याचा कालावधी एक महिन्याने वाढविला परंतु मार्च २०१४ च्या मध्यात एएमएनईपीएलने डी.जी.सेट बंद केले व ग्राहकांचा वीजपुरवठा बंद केला. त्यानंतर अर्जदाराने देखील दिनांक १३/०३/२०१४ रोजी "कर्तव्यच्युती सूचना" विविध कर्तव्यच्युती (Defaults) एएमएनईपीएलविरुध्द दाखवत बजावली.

१.१.११ अर्जदाराने दिनांक ११/०३/२०१४ च्या अर्जात नमूद केले की एएमएनईपीएलने डी.जी.सेट बंद केले आहेत व मिहान सेझला होणारा वीजपुरवठा बंद केला आहे व मा.आयोगाला विनंती केली की, योग्य दिशा दाखवून वीजेचा सल्पाय चालू करता यावा. मा.आयोगाने दिनांक ११/०४/२०१४ च्या दैनिक आदेशात खंडीत वीजेच्या आकडेमोडीवर आधारित जाणले की या आणीबाणीच्या परिस्थितीत मध्यावधी व्यवस्थेची ग्राहकांना अविरत वीजपुरवठा करण्यासाठी गरज आहे. दिनांक ११/०४/२०१४ च्या हीअरींग वर आधारित मा.आयोगाने महावितरणकडे अर्जदाराच्या भागातील ग्राहकांना वीजपुरवठा करण्याची तयारी आहे का अशी विचारणा केली. त्यावर महावितरणाने विजेची उपलब्धतता व महावितरणची त्वरीत तयारी असल्याचे सांगितले त्यानंतर मा.आयोगाने दिनांक १५/०४/२०१४ रोजी दिनांक ११/०४/२०१४ च्या आदेशाला शुध्दीपत्रक जाहीर केले व महापारेषणला या विषयीच्या पारेषण वितरण व संबंधित सिस्टिमच्या तांत्रिक मुद्दयाच्या प्रत्यक्ष व्यवस्थेमध्ये समाविष्ट केले (एएमएनईपीएल अर्जदार, महावितरण व महापारेषण) एएमएनईपीएल ने दिनांक ११/०४/२०१४ च्या आदेशाने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले. मा. उच्च न्यायालयाने एएमएनइपीएल ला हुकूम केला की ३० एप्रिल २०१४ पूर्वी प्रतिउत्तर दाखल करावे व मा.आयोगाला सांगितले की ०६ मे २०१४ पूर्वी /०६ मे २०१४ ला नव्याने सर्व संबंधितांची सुनावणी घ्यावी. एएमएनईपीएल नंतरच्या दिनांक २५ एप्रिल २०१४ व २७ एप्रिल २०१४ च्या उत्तरामध्ये आणीबाणीच्या परिस्थितीबाबत तपशीलवार मुद्दे देऊ शकले नाही. मा. आयोगाने नोंदविले की, महावितरण ने नमूद केले की एएमएन इपीएल वा महावितरणने ग्राहकाना वीज पुरवठा करण्यात कोणताच तांत्रिक मुद्दा नव्हता. परंतु, जर एखादा तांत्रिक मुद्दा उपस्थित झाला तर त्याचे निराकरण

अर्जदार, एएमएन इपीएल, महापारेषण व महावितरणने करावे. सर्व मंडळीचे म्हणणे ऐकून घेतल्यावर मा. आयोगाने आदेश नं ६२ – २०१४ व्दारे दिनांक ०६/०४/२०१४ रोजी आदेश दिले की ग्राहकांना समर्थपणे असा पर्याय हवी की त्यांना महावितरण कडून अविरत वीज मिळेल व महावितरण ज्यांनी अर्ज केले आहेत अशांना त्वरीत वीज पुरवठा सुरू करील. महावितरण कडून वीज घेण्याची इच्छा असणाऱ्या ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी महावितरण त्यांच्या विनंतिची छाननी केल्यानंतर एएमएन इपीएलचे व अर्जदाराचे वितरण / पारेषण जाळे वापरील, जेव्हा गरज असेल तेव्हा, त्यासाठी महावितरण योग्य आकार अदा करील. ही हंगामी व्यावस्था असेल व दोन्ही पक्ष (एएमएन इपीएल व अर्जदार) मा. आयोगाकडे येण्यास, एकदा सर्वसामान्य परिस्थिती झाली की, मोकळे असतील.

१.१.१२ अर्जदाराने दिनांक ३१/०७/२०१०४ रोजी Multimodal International Hub Airport at Nagpur (MIHAN) विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) साठी डीमइ वितरण परवानाधारक म्हणून अल्प मुदत वीज मिळण्यासाठी व वीज दराबाबत अर्ज दाखल केला. अर्जदाराने रु ४.३८६ प्रति युनिट अशी सरासरी वीजेची किंमत विचारार्थ पुढे मांडली. ग्राहकांच्या श्रेणीनिहाय वीजदर ग्राहकांना तात्पुरत्या तत्वावर लावण्यासाठीही विचारार्थ पुढे मांडला. मा. आयोगाने केस नं. १४९ of २०१४ मध्ये आपल्या दिनांक २०/०१/२०१५ च्या आदेशामध्ये नमूद केले की महावितरण ही त्याच भागातील दुसरी वितरण परवानाधारक आहे. त्यामुळे, अर्जदाराचा वितरण भाग विज कायदा २००३ च्या कलम ६२(१) च्या अटींखाली येतो ज्यात तरतूद आहे की, एकाच भागातील दोन किंवा जास्त वितरण परवानाधारकांना वीज वितरणाबाबत मा. आयोग एक कमाल मर्यादा किरकोळ वीज विक्री दर त्या भागासाठी ठरवेल. असा ठरविलेला वीज दर जोपर्यंत कमाल मर्यादा वीज दरापेक्षा कमी असेल, म्हणजे महावितरण च्या त्या प्रकारच्या ग्राहकाच्या दरापेक्षा, अर्जदार असा वीज दर आपल्या ग्राहकांना लावू शकतो.

१.१.१३ दैनिक आदेश दि. १८/११/२०१२ नुसार मा. आयोगाने आदेश दिले की, अर्जदार त्याची वीजेची गरज भागविण्यासाठी पॉवर एक्सचेंज मधून वीज घेऊ शकतो. मा. आयोगाच्या वरील आदेशानुसार, स्वत:च्या मालकीचे भारतीय वीज विनिमय (IEX) केंद्राचे सभासदत्व अर्जदाराने मिळविल्यानंतर दि. २२ नोव्हेंबर २०१४ पासून पुढील दिवसाच्या तत्वावर वीज खरेदीस सुरवात केली व आपल्या मिहान सेझ भागातील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यास सुरवात केली. अर्जदार मिहान सेझ भागातील ग्राहकांना रु. ४.३८६ प्रति किलोवॅट अवर या सरासरी दराने वीज विकत आहे. रु ३.२६ प्रति किलोवॅटअवर ते रु ३.५० प्रति किलोवॅट अवर या बदलत्यादराने फेब्रुवारी २०१५ पर्यंत अर्जदाराने वीज विकत घेतली.

भारतीय वीज विनिमय केंद्राचे वीज दर प्रति दिन बदलत असल्याने, अर्जदाराने स्पर्धात्मक बोली व्दारा लॉइड मेटलस आणि एनर्जी लिमिटेड यांचेकडून ०० to २४ तास प्रति युनिट रु ३.५० व १२०० ते १८०० तास या वेळेसाठी रु. ३.९० प्रति युनिट या दराने वीज विकत घेतली.

अर्जदाराने परत दि. ०१ एप्रिल २०१५ ते १० जून २०१५ भारतीय वीज विनिमय केंद्रातून वीज विकत घेतली.

१.१.१४ अर्जदाराने लघू मुदत वीज मिळण्याच्या तत्वावर वीज मिळण्यासाठी बोली मागविल्या. अर्जदाराने महावितरणाला इरादापत्र रु ३.१५ प्रति किलोवॅटअवर दराने वीज विकत घेण्यासाठी ११ जून २०१५ ते ३० एप्रिल २०१६ या ११ महिन्याच्या कालावधीसाठी दिले. अर्जदार दि. ११ जून २०१५ पासून ३.१५ रु. प्रति किलो वॅट अवर या दराने २२० केव्ही एएमएन इपीएल बस व खैरी खुर्द, हिंगणा, नागपूर येथील महापारेषणची खैरी पारेषण व्यवस्था या ठिकाणी वीज विकत घेत आहे. अर्जदार, महावितरण व महाराष्ट्र राज्य विद्दुत पारेषण कं लिमिटेड (महापारेषण) यांचे प्रतिनिधी सामुदायिक रित्या प्रत्येक आठवडयाला या मीटरचे वाचन करतात. यानंतर अर्जदाराच्या विनंतिनुसार महावितरणने कराराची मुदत सहा-सहा महिने कालावधीसाठी वाढविली. महावितरण बरोबरचा सध्याचा वीज खरेदी करार रु ४.८९ प्रति किलो वॅट अवर दराने ३१ ऑगस्ट २०१९ पर्यंत आहे.

१.१.१५ अर्जदार मिहान सेझ मधील ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी एएमएन इपीएल ची २२० केव्ही पारेषण व्यवस्था वापरत आहे व तात्पुरच्या स्वरुपात रु. ०.१४ प्रति किलोवॅट अवर दराने त्यासाठी रक्कम अदा करीत आहे.

## १.२ बहुवर्षीय वीजदराबाबत पूर्वपीठीका : -

१.२.१ मा. आयोगाने दि. ०८ डिसेंबर २०१५ रोजी मविनिआ (बहुवर्षीय वीजदर) नियम, २०१५ निर्गमीत केले आहेत. हे नियम ०१/०४/२०१६ पासून तिसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी लागू करण्यात आले आहेत. आयोगाने ARR ची मुख्य तत्वे व MYT सादर करण्याचे नियम नियंत्रण कालावधीसाठी जाहिर केले आहेत.

१.२.२ केस नं ४७ of २०१५ च्या दि. १० मे २०१६ च्या आदेशामध्ये मा. आयोगाने अर्जदाराला आदेश दिले की, तीन महिन्याचे आत, बहुवर्षीय वीज दर अर्ज ऑगस्ट २०१६ पर्यंत दाखल करावा. ही मुदत परत तीन महिन्यासाठी नोव्हेंबर २०१६ पर्यंत वाढविण्यात आली. अर्जदाराने परत अर्ज दाखल करण्याचा कालावधी ३ फेब्रुवारी २०१७ पर्यंत वाठविण्याची विनंती केली. अर्जदाराने मा. आयोगाला शेवटची मुदत वाढ एक महिन्यासाठी मार्च २०१७ पर्यंत वाढवून देण्याची विनंती केली.

### १.२.३ सध्याच्या वीजदरापासून उत्पन्न १४९ of२०१४ केस प्रमाणे (तात्पुरत्या वीजदर आदेशाप्रमाणे)

१.३ सद्द वीजदरापासून उत्पन्न व तफावतीची मीमांसा :

१.३.१ पूर्वीच्या आर्थिक वर्ष २०१४-२०१५, व २०१५-१६, आ.व. २०१६-१७ व आ व २०१७-१८ यामधील एकूण उत्पन्नातील तफावत व (carrying costs ) ही रक्कम एकूण रु. ३३.४३ कोटी होते व ही रक्कम आर्थिक वर्ष २०१८-१९ ची सुरवातीची तफावत आहे.

**तक्ता १ : आर्थिक वर्षे २०१४-१५ ते २०१७-१८ साठी टेबल १ : तफावतीची मीमांसा :-**

| तपशील | आव २०१४-१५ | आव २०१५-१६ | आव २०१६-१७ | आव २०१७-१८ |
|---|---|---|---|---|
| सध्याच्या वीजदरापासून उत्पन्न रु. कोटी (प्रत्यक्ष) | २.८४ | ११.१० | १४.८८[१] | २०.४५[२] |
| स्टॅण्डअलोन ARR (रु. कोटी) | ६.१६ | १९.४१ | २२.५६ | २९.२४ |
| उत्पन्नातील तफावत (रु. कोटी) | ३.३२ | ८.३१ | ७.६८ | ८.७९ |
| सुरवातीची तफावत (रु. कोटी) | - | ३.५१ | १२.६७ | २२.१३ |
| तफावतीतील वाढ (रु. कोटी) | ३.३२ | ८.३१ | ७.६८ | ८.७९ |
| शेवटची तफावत (रु. कोटी) | ३.३२ | ११.८२ | २०.३४ | ३०.९२ |
| Carrying cost rate (weighted average Bank Rate) + १५०bps / SBI MCLR + १५०bps (%) | ११.५० % | ११.०४ % | १०.८० % | ९.५० % |
| Carrying cost (रु. कोटी) | ०.१९ | ०.८५ | १.७८ | २.५२ |

**एकत्रित तफावतीची मीमांसा : -**

१) सध्याच्या वीजदराप्रमाणे महसुल केस १४९ of २०१४ (तात्पुरता वीजदर ऑर्डर)

२) सध्याच्या वीजदराप्रमाणे महसुल केस १४९ of २०१४ (तात्पुरता वीजदर ऑर्डर)

१.३.२ आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० साठी Projected Revenue सध्याच्या वीज दरानुसार रु. ३३.१७ कोटी व रु. ५४.३१ कोटी येतो. परंतु Estimated Stand Alone ARR रु. ४८.७८ कोटी व रु. ७६.१८ कोटी आहे.

१.३.३ आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० करिता सध्याच्या वीजदरानुसार Stand Alone Revenue Gap रु. १५.६१ कोटी व रु. २१.८७ कोटी खालील टेबलमध्ये दर्शविल्याप्रमाणे आहेत.

**तक्ता २ : आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० करिता (Revenue Gap) उत्पन्नातील तफावत**

| तपशील | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|
| सध्याच्या वीजदरानुसार उत्पन्न (रु. कोटी) | ३३.१७ | ५४.३१ |
| Stand Alone ARR वार्षिक महसुलीची गरज | ४८.७८ | ७६.१८ |
| उत्पान्नातील तफावत (रु. कोटी) | १५.६१ | २१.८७ |

**१.४ नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित वीज दर**

१.४.१ अर्जदार मागील उत्पन्नातील तफावत रु. ३३.१७ ची वजा वट करु इच्छीत नाही कारण त्यामुळे वीजदरामध्ये वाढ होईल.

१.४.२ दुसरे म्हणजे, अर्जदाराने Stand Alone तफावतीची पूर्ण वसुली नियंत्रण कालावधी (आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२०) करीता न करण्याचे ठरविले आहे जेणेकरुन ग्राहकाना बसणारा वीजदर वाढीचा धक्का कमी होईल.

अशी आश आहे की ग्राहकांमध्ये हळुहळु वाढ होईल आणि पूर्वीची संचित तफावत तसेच Partial आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मधील तफावतीची वसुली पुढील नियंत्रण कालावधीमध्ये करता येईल. असे अपेक्षित आहे की ग्राहकांच्या संख्येमध्ये हळुहळु वाढ होईल त्यामुळे पुर्वीची संचित तफावत तसेच आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० ची अंशत: Stand Alone Gap ची वसुली पुढील नियंत्रण कालावधीमध्ये करता येईल.

१.४.३ प्रस्तावित वीजदरापासून महसूल ठरविताना अर्जदाराने उच्च दाब प्रवर्गात दोन भाग ठरविले आहेत.

(१) उच्च दाब औद्योगिक (२) उच्च दाब वाणिज्यिक तसेच लघुदाब प्रवर्गात (१) LTA – २० KW पेक्षा कमी Cantract Demand असणारे व (२) LT-B –Contract Demand २० KW पेक्षा जास्त असणारे.

१.४.४ प्रवर्गनिहाय प्रस्तावित सरासरी बिलींग दर (ABR) आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी खाली दिले आहेत.

**तक्ता ३ : – प्रवर्गनिहाय सध्याचे व प्रस्तावित सरासरी बिलींगदर (ABR) आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी**

| तपशील | सध्याचे दर रु./ किलो वॅट अवर | प्रस्तावित दर रु. किलो वॅट अवर |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| उच्च दाब प्रवर्ग | ४.५३ | ४.७२ |
| लघु दाब प्रवर्ग | ४.४४ | ४.२० |
| सरासरी | ४.५३ | ४.७० |

१.४.५ प्रवर्गनिहाय प्रस्तावित सरासरी बिलींग दर (ABR) आर्थिक वर्ष २०१९-२० साठी खाली दिले आहेत.

**तक्ता ४ : — प्रवर्गनिहाय सध्याचे व प्रस्तावित सरासरी बिलींग दर आर्थिक वर्ष २०१९-२० साठी**

| तपशील | सध्याचे दर रु. / किलोवॅट अवर | प्रस्तावित दर रु. / किलोवॅट अवर |
|---|---|---|
| उच्च दाब प्रवर्ग | ४.४९ | ४.४२ |
| लघुदाब प्रवर्ग | ४.४६ | ३.५० |
| सरासरी | ४.४९ | ४.३९ |

## १.५ एकूण महसुलाची आवश्यकता (ARR) आर्थिक वर्ष २०१८-१९ ते २०१९-२०

१.५.१ मा. आयोगाने म वि नि आ बहुवर्षीय वीजदर नियम, २०१५ मध्ये आखून दिलेल्या नियमाप्रमाणे एकूण महसुलाची आवश्यकता काढली आहे.

१.५.२ अर्जदाराने आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० साठी खालीलप्रमाणे एकूण महसुलाची आवश्यकता प्रक्षेपित केली आहे.

**तक्ता ५ : — एकूण महसुलाची आवश्यकता (वितरण Wires व किरकोळ Supply) आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० करिता**

| तपशील | आर्थिक वर्ष २०१८-१९ प्रक्षेपित | आर्थिक वर्ष २०१९-२० प्रक्षेपित |
|---|---|---|
| वीज खरेदीवर खर्च (रु. कोटी) | ३६.३७ | ६३.११ |
| संवसु (रु. कोटी) | २.३८ | २.४६ |
| घसारा (रु. कोटी) | ३.०४ | ३.०४ |
| कर्जावरील व्याज (रु. कोटी) | २.२८ | १.९६ |
| खेळत्या भांडवलावरील वरील व्याज (रु. कोटी) | ०.१७ | ०.१७ |
| ग्राहकांच्या सुरक्षित ठेवीवरील व्याज (रु. कोटी) | ०.३८ | ०.३८ |
| Bad व Doubtful कर्जासाठी तरतूद (रु. कोटी) | ०.०८ | ०.११ |
| Contingency Reserve (रु. कोटी) | ०.६६ | ०.८२ |

| | | |
|---|---|---|
| एएम एन इ पीएल ला दिलेले वितरण charges (रु. कोटी) | १.०८ | १.७७ |
| इनकम टॅक्स आयकर (रु. कोटी) | ०.४८ | ०.४८ |
| भागभांडवलावरील परतावा (रु. कोटी) | २.३७ | २.३७ |
| वजा : वीजदरा व्यतिरिक्त उत्पन्न (रु. कोटी) | ०.५१ | ०.५१ |
| एकूण महसुलाची आवश्यकता (रु. कोटी) | ४८.७८ | ७६.१८ |

**तक्ता ६ : — ग्राहकांच्या प्रवर्गासाठी प्रस्तावित सरासरी बिलींग दर (ABR) खालीलप्रमाणे :-**

| वर्गवारी | आर्थिक वर्ष २०१८-१९ | आर्थिक वर्ष २०१९-२० |
|---|---|---|
| उच्च दाब औद्योगिक ABR रु. / किलोवॅट अवर | ४.५८ | ४.२५ |
| उच्च् दाब वाणिज्य ABR रु. / किलोवॅट अवर | ५.०१ | ५.०० |
| उच्च् दाब प्रवर्ग ABR रु. / किलोवॅट अवर | ४.७२ | ४.४२ |
| लघुदाब (LT-A) (20 किलोवॅट पेक्षा कमी ABR रु. / किलोवॅट अवर | ३.४२ | २.९० |
| लघुदाब (LT-B) (20 किलोवॅट पेक्षा जास्त ABR रु. / किलोवॅट अवर | ४.३१ | ३.५९ |
| लघुदाब प्रवर्ग ABR रु. / किलोवॅट अवर | ४.२० | ३.५० |
| सरासरी ABR रु. / किलोवॅट अवर | ४.७० | ४.३९ |

१.६ प्रस्तावित प्रवर्गनिहाय वीज दर प्रस्तावित ग्राहकांच्या वेगवेगळया प्रवर्गासाठी सरासरी बिलींग दर खालीलप्रमाणे : -